महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
७ वा मजला, बेलापूर भवन, सेक्टर-११, सी.बी.डी बेलापूर,
नवी मुंबई- ४००६१४, दुरध्वनी क्र.०२२-२७५६०१४५

ई-मेल-dmainfo४@gmail.com WebSite- https://mahadma.maharashtra.gov.in


जावक क्र.नपप्रसं/ पाणी गळती/२०२६/कक्ष-१/ 1225 दिनांक- 13 JUL 2026

# जाहीर सूचना

नगरपरिषद प्रशासन कार्यालयाचे बेलापुर येथील कार्यालय बेलापुर भवन येथील सातव्या मजल्यावर स्थित कार्यालयात चार स्वच्छतागृहामधून पाणीगळती होत आहे. त्याअनुषंगाने सदर स्वच्छतागृहातील पाणी तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरील दुरुस्तीचे कामे करून घेणे करीता संबंधित बाह्य यंत्रणेकडून/अधिकृत पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे. कामाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ. क्र | कामाचा तपशील | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १ | संचालनालयातील चार स्वच्छतागृहातील पाणी गळती दुरुस्तीबाबत | रु. ५०,०००/- |

खुल्या बाजारातील इच्छुक पुरवठादारांकडून सीलबंद पाकिटात दरपत्रक दि १३.०७.२०२६ पासून दि. २१.०७.२०२६ पर्यत सायंकाळी ५:३० वाजेपर्यत कार्यालयात सक्षम स्वीकारली जातील .पाकिटावर स्वच्छतागृहातील पाणीगळती दुरुस्तीबाबत दरपत्रक असे नमूद करणे आवश्यक आहे.

तसेच दरपत्रक पुरवठादार/प्रतिनिधी यांच्या समक्ष उघडली जाणार असल्यामुळे दि.२२.०७.२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यत पुरवठादार /प्रतिनिधी यांनी नगरपरिषद प्रशासन संचालनालय, ७ वा मजला ,बेलापूर भवन, सी .बी .डी .बेलापूर ,नवी मुंबई ४००६१४ -येते उपस्थित राहावे.

**अटी व शर्ती**

१) कंत्राटदारांनी वापरलेले साहित्य हे उच्च दर्जाचे असावे
२) त्या अनुषंगाने कार्यादेश प्राप्त झाल्यावर ७ दिवसात रु. ५०० च्या स्टँप पेपरवर करारनामा करून १० दिवसात काम पूर्ण करावे.
३) नमूद दर हे GST सह असावे, नमूद दारावर GST देण्यात येणार नाही.
४) दर पत्रक धारकांना दरपत्रकात मध्ये दर्शवलेली दर बंधनकारक राहील, त्याहून अधिक खर्च आल्यास संचालनालय जबाबदार राहणार नाही.
५) दि. २१.०७.२०२६ रोजी सायंकाळी ५:३० नंतर प्राप्त दरपत्रक कार्यालयात स्वीकारली जाणार नाहीत.
६) काम पूर्ण झाल्यावर देयक सादर करण्यात यावीत त्यानंतर देयके अधिदान व लेखा कार्यालयात सादर केली जातील . अधिदान व लेखा अधिकारी यांनी देयके मंजूर केल्यावर पुरवठादाराला देयकाची रक्कम प्राप्त होईल.
७) दरपत्रक प्रक्रियेसंबधीचे सर्व अधिकार मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे राहतील. दरपत्रकेबाबत मा. आयुक्त तथा संचालक यांचा निर्णय अंतिम राहील.

दि.

(डॉ चारुशीला पंडित)
उपायुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय